जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१६/7922
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांकः- 10/१२/२०१६

प्रति,

शासनमान्य संगणक टंकलेखन संस्था,
महाराष्ट्र व गोवा.

**विषय :- संगणक टायपिंग सांकेतांक प्रस्तावातील त्रुटींच्या लिंक (Link) उपलब्धतेबाबत (टप्पा-१,२ व ३)**

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षेच्या (GCC-TBC) अभ्यासक्रमास विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मान्यता देऊन ई-प्रमाणपत्रासाठी परिषदेकडे ज्या संस्थांची शिफारस केली आहे, अशा टप्पा क्र.१,२ व ३ मधील शिफारसपात्र संस्थांच्या ई-प्रमाणपत्र (सांकेतांक) प्रस्तावातील त्रुटींची यादी परिषदेच्या mscepune.in या संकेतस्थळावर देण्यात येत आहे. याबाबत संबंधित सस्थांनी पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

१) सदर त्रुटींची पुर्तता संबंधित संस्थेने online पध्दतीने करावयाची आहे.

२) त्रुटी पुर्ततेची कागदपत्रे अपलोड करण्यासाठी शनिवार दिनांक १०/१२/२०१६ ते सोमवार दिनांक १९/१२/२०१६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत लिंक देण्यात येत आहे.

३) सदरची लिंक टप्पा क्रमांक १,२ व ३ मधील त्रुटी असणाऱ्या संस्थांसाठी देण्यात येत आहे.

४) ही त्रुटी पुर्ततेसाठी लिंक आहे. नव्याने प्रस्ताव संस्थेस मान्यतेस्तव सादर करण्यासाठी स्वतंत्र लिंक सुरु आहे .

५) विहीत कालावधीत त्रुटी पुर्तता करण्याची दक्षता (ऑनलाईन पध्दतीने कागदपत्रे अपलोड करण्याची) संबंधित संस्थाचालकांनी घ्यावी.

६) त्रुटी पुर्ततेची कागदपत्रे टपालाने किंवा ई-मेलने पाठवू नयेत.

**(राजेश क्षीरसागर)**
**उपायुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे -१**

E:\s\New letter\ALL GCC EXAM FILES\2016\prilist.docx